# Lloyds Metals and Energy Limited

Regd. Office : Plot No. A 1-2, MIDC Area, Ghugus, Dist. Chandrapur, 442 505, Maharashtra. Tel. 07172 285099 /103/398 Fax 07172 285003.
F d R Wd / F / 49th Floor, Kamala City, Senapati Bapat Marg, Lower Parel, Mumbai-400 013. Tel.No. 022- 6291 8111. Fax No. 022-6291 8260
CIN: L40300MH1977PLC019594 **Website :** www.lloyds.in **Email:** investor@lloyds.in


**Date:- 08th July, 2020**

**To,**
**BSE Limited**
The Corporate Relationship Department
P.J. Towers, 1st Floor,
Dalal Street,
Mumbai – 400 001

To,
Head- Listing & Compliance
**Metropolitan Stock Exchange of India Ltd. (MSEI)**
Vibgyor Towers, 4th floor,
Plot No C 62, G - Block,
Opp. Trident Hotel,
Bandra Kurla Complex,
Bandra (E), Mumbai – 400 098

**Sub: Publication of Notice of Board Meeting dated 14th July, 2020**
**Ref: BSE Scrip Code: 512455**
**BSE and MSEI Scrip ID: LLOYDSME**

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 47 (1) (a) and 47(3) of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we have pleasure to furnish herewith the newspaper clippings of Notice of the Board Meeting to be held on 14th July, 2020, published in newspapers – Business Standard (English) and Chandrapur Mahasagar (Marathi) on 08th July, 2020.
Kindly take note of the same.

Thanking you,
Yours faithfully,
**For Lloyds Metals and Energy Limited**

RIYAZ AHMED SHAIKH
Digitally signed by RIYAZ AHMED SHAIKH
Date: 2020.07.08 14:14:08 +05'30'

**Riyaz Shaikh**
**Chief Financial Officer**

जिल्हा विशेष

# चंद्रपूर महासागर

बुधवार, दि.०८ जुलै २०२०     पृष्ठ : ३

# चंद्रपूर जिल्हातील चिमूर, भद्रावती व ब्रह्मपुरी शहरात लॉकडाऊन

**चंद्रपूर दि.०७ (प्रतिनिधी):** चंद्रपूर जिल्ह्यामध्ये बाधितांची संख्या १२५ व पुण्याचे तीन मिळून १२८ वर गेली असून ग्रामीण भागात कोरोना बाधितांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. जिल्ह्यातील चिमूर, भद्रावती आणि ब्रह्मपुरी या तीन शहरांमध्ये लॉकडाऊन घोषित केलेले आहे. जीवनावश्यक वस्तू व सेवांचा पुरवठा सोडून इतर सर्व व्यवहार हे बंद करण्यात आलेले आहे. नागरिकांनी घराबाहेर पडू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.कुणाल खेमनार यांनी केले आहे. लॉकडाऊन दरम्यान, खाजगी व सार्वजनिक कार्यक्रम घेण्यासाठी संपूर्णपणे मनाई असणार आहे.

जिल्हाधिकारी यांनी व्हिडिओ संदेशाच्या माध्यमातून बाहेरून येणाऱ्या नागरिकांना संस्थात्मक अलगीकरण बंधनकारक आहे. या नागरिकांची आरोग्य तपासणी व नोंद केली जात आहे. संस्थात्मक अलगीकरणात दाखल झालेले नागरिकांचे पाच दिवसात स्वॅब घेऊन तपासणीसाठी पाठवण्यात येतात. स्वॅबचा अहवाल निगेटिव्ह आल्यास पुढील दहा दिवसात त्या नागरिकाला गृह अलगीकरणात ठेवण्यात येत आहे. त्यामुळे बाहेरून येणाऱ्या नागरिकांना संस्थात्मक अलगीकरणानंतर गृह अलगीकरणात राहणे बंधनकारक असणार आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत बाधितांची एकूण संख्या १२५ व पुण्याचे तीन मिळून १२८ वर पोहोचली आहे. यापैकी ७१ बाधित कोरोना मुक्त झाल्यामुळे त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे. सध्या उपचार घेत असणाऱ्या बाधितांची संख्या ५७ इतकी आहे. या सर्व बाधितांची प्रकृति स्थिर आहे.

मंगळवारी दुपारी जिल्हा आरोग्य यंत्रणेनेकडून वरील माहिती देण्यात आली. माहितीनुसार पुणे येथील रहिवाशी असलेल्या आणि संस्थात्मक अलगीकरणात असलेल्या २३, ५३ व २३ वयाच्या तीन जवानांचे रविवारी घेण्यात आलेले स्वॅब पॉझिटीव्ह आले आहेत. हे सर्व पुणे येथून आले होते. एक जुलैला एकाच ठिकाणी हे तीनही जवाण संस्थात्मक अलगीकरणात होते.

तर सोमवारी दिवसभरात एकूण ४ रुग्ण चंद्रपूर जिल्हयात पॉझिटीव्ह ठरले आहे. यामध्ये नागपूरच्या कामठी परिसरातून २६ जून रोजी परत आलेल्या २७ वर्षीय ऊर्जानगर येथील रहिवासी असणाऱ्या व्यक्तीचा स्वॅब सोमवारी पॉझिटिव्ह आला आहे.

याशिवाय पडोली येथील एमआयडीसीत काम करणाऱ्या ३६ वर्षीय नागरिकाचा स्वॅब देखील पॉझिटिव्ह आला आहे. या व्यक्तीने दोन ठिकाणी खाजगी इस्पितळात ताप आल्यामुळे तपासणी केली होती.

तत्पूर्वी सोमवारी सायंकाळी सहाच्या सुमारास आलेल्या २ बाधितांमध्ये चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील संस्थात्मक अलगीकरणात असणाऱ्या भिवापूर वार्ड परिसरातील ३० वर्षीय महिलेचा समावेश आहे. हैदराबाद शहरातून ही महिला चंद्रपूरमध्ये आली होती. काल त्यांचा स्वॅब घेण्यात आला. आज तो पॉझिटिव्ह आला आहे.

दुसरा बाधित हा करंजी येथील पॉझिटिव्ह बाधितांच्या संपर्कातील आहे. पोंभूर्णा तालुक्यातील मौदा येथील २१ वर्षीय तरुण संस्थात्मक अलगीकरणात होता. काल स्वॅब घेण्यात आल्यानंतर आज तो पॉझिटिव्ह ठरला आहे.

जिल्ह्यातील विविध तपासणी नाक्यावर पोलिसांचा बंदोबस्त आणखी वाढवला आहे. येणाऱ्या प्रत्येक नागरिकांची, वाहनांची तपासणी केल्या जात आहे. या प्रत्येक वाहनांची, नागरिकांची माहितीची नोंद केली जात आहे.

या नोंदणी नुसार अशा नागरिकांना संपर्क करून ती संस्थात्मक अलगीकरण झाले आहेत की नाही याची खात्री करण्यात येत आहे.

नागरिकांनी कोणतीही माहिती न लपविता प्रशासनाला सहकार्य करावे. माहिती लपविणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. कुणाल खेमनार यांनी स्पष्टकेले आहे.

बाहेरून येणाऱ्या नागरिकांनी स्वतःहून शकुंतला लॉन येथे जावे तसेच तालुक्याच्या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालयात जाऊन स्वतः आरोग्य तपासणी करून संस्थात्मक अलगीकरणात रहावे. स्वतः आणि कुटुंबाला सुरक्षित ठेवण्यासाठी संस्थात्मक अलगीकरण महत्वाचे आहे. संस्थात्मक अलगीकरणात आरोग्यविषयक सर्व सुविधा व काळजी घेण्यात येत आहे.

प्रत्येक ग्रामपंचायतीला प्राथमिक सुविधेसाठी २५ हजार रुपये प्रशासनाकडून देण्यात येणार आहे. यामुळे कोरोना प्रतिबंधक उपाय योजनेसाठी मदत मिळणार आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी आरोग्य सेतू अॅप डाऊनलोड करावा. आरोग्य सेतूच्या माध्यमातून सेल्फ असेसमेंट आणि ब्लूटूथ असेसमेंट तसेच जिल्ह्यातील संभाव्य कोरोनाचे हॉटस्पॉट आहेत याची यादी देखील प्रशासनाला प्राप्त होत आहे. या ठिकाणी नागरिकांची तपासणी व सर्वेक्षण करण्यात येत आहे. आरोग्य सेतूच्या माध्यमातून काही नागरिक पॉझिटिव्ह मिळालेले आहेत.

जिल्ह्यामध्ये येणाऱ्या आठवड्यामध्ये कोरोना संदर्भात अँटीजेन टेस्टिंग करण्यात येणार आहे. ही चाचणी नेहमीच्या कोरोना चाचणी पेक्षा सोपी व कमी वेळात होणारी आहे. ही चाचणी गावात जाऊन देखील करता येणार आहे. यासाठीच्या मनुष्यबळ, प्रशिक्षणाला सुरुवात करणार आहे. पुढच्या आठवड्यात ही चाचणी सुरू करण्याचे नियोजन आहे. अति जोखमीच्या संपर्कातील व्यक्तींची चाचणी करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ.कुणाल खेमनार यांनी सांगितले आहे.

जिल्ह्यामध्ये कोरोनाच्या ६ हजार ५२५ चाचण्या केलेल्या आहेत. दर दिवशी २०० ते ३०० चाचण्या केल्या जात आहे. आरोग्य सेतू ?पच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यामध्ये ४८ हॉटस्पॉट मिळालेले आहेत. त्यामुळे आपल्या अवतीभवती बाधित असल्याचे नाकारता येत नाही.

बाहेरून आलेल्या नागरिकांनी आरोग्य तपासणी, नोंदणी व संस्थात्मक अलगीकरण केले नाही अशा नागरिकांची प्रशासनाला १०७७ या टोल फ्री क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## चंद्रपूर बाधितांची संख्या १२५ वर

जिल्ह्यामध्ये सोमवारी रात्री उशिरापर्यत एकूण ७ पॉझिटिव्ह बाधितांची भर पडली आहे. यामध्ये ३ राज्य राखीव पोलीस दलाचे जवान ( एसआरपीएफ ) आहेत. ते पुणे येथील मूळ निवासी आहेत. त्यामुळे त्यांची चंद्रपूरच्या बाधितांमध्ये गणना होणार नाही. त्यांचा अहवाल पॉझिटीव्ह असला तरी कोणतेही लक्षणे नाहीत. त्यांची प्रकृती स्थिर आहे. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या तिघांना वगळता चंद्रपूर जिल्ह्यातील रविवारी १२१ वर असणारी कोरोना पॉझिटीव्ह संख्या वाढून सोमवारी १२५ झाली आहे. ( १२८ – ३पुणे=१२५ ) आतापर्यंत ६२ बाधित कोरोना मुक्त झाले आहे. तर सध्या उपचार घेत असलेल्या संक्रमितांची संख्या ६३ आहे. मंगळवारी दुपारी जिल्हा आरोग्य यंत्रणेनेकडून वरील माहिती देण्यात आली. माहितीनुसार पुणे येथील रहिवाशी असलेल्या आणि संस्थात्मक अलगीकरणात असलेल्या २३, ५३ व २३ वयाच्या तीन जवानांचे रविवारी घेण्यात आलेले स्वॅब पॉझिटिव्ह आले आहेत. हे सर्व पुणे येथून आले होते. एक जुलैला एकाच ठिकाणी हे तीनही जवाण संस्थात्मक अलगीकरणात होते. तर सोमवारी दिवसभरात एकूण ४ रुग्ण चंद्रपूर जिल्हयात पॉझिटीव्ह ठरले आहे. यामध्ये नागपूरच्या कामठी परिसरातून २६ जून रोजी परत आलेल्या २७ वर्षीय ऊर्जानगर येथील रहिवासी असणाऱ्या व्यक्तीचा स्वॅब सोमवारी पॉझिटिव्ह आला आहे. याशिवाय पडोली येथील एमआयडीसीत काम करणाऱ्या ३६ वर्षीय नागरिकाचा स्वॅब देखील पॉझिटिव्ह आला आहे. या व्यक्तीने दोन ठिकाणी खाजगी इस्पितळात ताप आल्यामुळे तपासणी केली होती. तत्पूर्वी सोमवारी सायंकाळी सहाच्या सुमारास आलेल्या २ बाधितांमध्ये चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील संस्थात्मक अलगीकरणात असणाऱ्या भिवापूर वार्ड परिसरातील ३० वर्षीय महिलेचा समावेश आहे. हैदराबाद शहरातून ही महिला चंद्रपूरमध्ये आली होती. काल त्यांचा स्वॅब घेण्यात आला. आज तो पॉझिटिव्ह आला आहे. दुसरा बाधित हा करंजी येथील पॉझिटिव्ह बाधितांच्या संपर्कातील आहे. पोंभूर्णा तालुक्यातील मौदा येथील २१ वर्षीय तरुण संस्थात्मक अलगीकरणात होता. काल स्वॅब घेण्यात आल्यानंतर आज तो पॉझिटिव्ह ठरला आहे.

## जुगार अड्ड्यावर धाड एक लाख २१ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त

**वरोरा दि.०७ (प्रतिनिधी):** स्थानीय पोलीस स्टेशनला मिळालेल्या गुप्त सूचनेच्या आधारावर पोलिसांनी ६ जुलै रोजी सोमवारला नृतेश कुंभारे राहणार सुभाष वार्ड यांचे घरी धाड टाकून एक्का बादशहा जुगार खेळणाऱ्या एकूण दहा लोकांना जेरबंद केले.

वरोरा शहरात सध्या स्थितीत मोठ्या प्रमाणावर जुगार खेळल्या जात आहे, याच पार्श्वभूमीवर स्थानीय पोलीस जुगार खेळणाऱ्या लोकांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. त्याच आधारावर पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहिती द्वारे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक मडावी यांनी पोलीस स्टाफ चे विलास बल्की, दीपक दुधे, रुखमा बुटे यांना सोबत घेऊन रुपेश कुंभारे यांनी त्यांचे घरी भरविलेल्या जुगारावर धाड टाकून ४९ हजार १८० रुपये नगदी तसेच ८ मोबाईल ज्याची किंमत ७२ हजार रुपये व ५२ ताश पत्ते असा एकूण १ लाख २१ हजार १८० रुपयाचा मुद्देमाल मिळून आल्याने सपोनि मडावी यांनी पंचनामा करून कारवाई करून सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(१)दाऊद खान रहिम खा पठाण (३२ ), (२)आकाश नारायण पराते (३१), ( ३ )अर्शद शोयब मलिक (३९ ), (४)संजय वामनराव कुंभारे( ४८ ), (५)दिलीप वसंत निमजे (५०), (६)सुभाष राजेश?वर कुंभारे ( ४१), (७)अश्फाक शरीफ शेख (४०), (८)अनिल वसंतराव कुंभारे (५३), राहणार सर्व सुभाष वार्ड, तसेच (९) मोरेश्वर गजानन व्यापारी (४२ )राहणार बोर्डा इत्यादी आरोपीवर कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्या अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास वरोरा पोलिस करीत आहे.

## शेती करण्यासाठी ब्रह्मपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांना गडचिरोलीच्या सिमेत जाण्याची परवानगी द्या

### आपच्या अॅड. पारोमिता गोस्वामी यांची मागणी

**चंद्रपूर दि.०७ (प्रतिनिधी):** ब्रह्मपुरी तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांचे जमीनी गडचिरोली जिल्ह्याच्या हद्दीत आहे, त्यांना शेतीचे कामासाठी मुक्त संचार करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी आम आदमी पार्टीच्या सदस्या अॅड. पारोमिता गोस्वामी यांनी गडचिरोलीचे जिल्हाधिकारी दीपक सिंगला यांच्याकडे केली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने, त्यातही ब्रह्मपुरी तालुक्यात याचा धोका अधिक वाढल्याने गडचिरोलीचे जिल्हाधिकारी दीपक सिंगला यांनी आदेश काढून, चंद्रपूर जिल्ह्यातील कोणत्याही नागरिकांना गडचिरोलीत प्रवेश करण्यास मज्जाव केला . या आदेशात ब्रह्मपुरी तालुक्यातील जनतेला गडचिरोली जिल्ह्यात कोणत्याही परिस्थितीत प्रवेश देऊ नये असेही ही आदेशित केले. ब्रह्मपुरी तालुक्याला गडचिरोली जिल्ह्याची सीमा लागून आहे आणि ब्रह्मपुरी तालुक्यात वास्तव करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांच्या शेती गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेत आहे. सध्या खरीप हंगाम चालू झाल्याने शेतकऱ्यांना दररोज शेतात काम करावे लागते मात्र जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे आदेशामुळे ब्रह्मपुरी येथील शेतकऱ्यांना गडचिरोली येथील शेती जाऊन काम करणे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे संपूर्ण वर्ष विनाशेतीने या शेतकऱ्यांना काढावे लागेल. त्यामुळे आधीच डबघाईस आलेल्या शेतकऱ्यांवर ही आणखी मोठी मोठे संकट कोसळणार आहे. आणि त्यामुळे तातडीने जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी ब्रम्हपुरी

तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीचे कामासाठी गडचिरोलीच्या सीमेत जाऊन शेती करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी अॅड. गोस्वामी यांनी जिल्हाधिकारी दीपक सिंगला यांचे यांना ई-मेलने माध्यमातून निवेदन पाठवून मागणी केली आहे.

## धाबा परिसरात नदीपात्रातून नावेने दारूतस्करी

**गोंडपिपरी दि.०७ (प्रतिनिधी):** महाराष्ट्र–तेलंगानासिमेवरील धाबा परिसरात अवैध दारूविक्री सद्या चांगलीच चर्चेत आली आहे. अश्यातच काल सोमवारी परप्रांतातून दारूचा पुरवठा होणारा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. त्यामुळे आज धाबा पोलिसांनी नदीकाठावर धाड टाकून डोंग्यासह दारू, मोटारसायकलिसह विक्रेत्यांना ताब्यात घेतले आहे.

धाबा पोलीस स्टेशन अंतर्गत गावात परप्रांतातून दारूचा पुरवठा होत असल्याचा प्रकार काही दिवसांपासून चर्चेत होता. अश्यातच काल सोमवारी सिमेवरील डोंगरगावच्या हद्दीतून डोंग्याद्वारे दारूचा पुरवठा होत असल्याचा व्हिडीओ सोशल मिडियावर वायरल झाला. यापूर्वी



सुद्धा परिसरात अवैध दारू विक्रीसंदर्भात चांगलीच चर्चा रंगली. अश्यातच काल वर्धा नदीतून दारूपुरवठा होत असल्याचा व्हिडिओ सर्वांनी बघितला. यामुळे पोलिस वर्तुळात एकच खळबळ उडाली. याच दरम्यान गोजोली येथील एका सामाजिक कार्यकर्त्याने नदीकाठावर भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. त्यावेळी दारूपुरवठा होत असल्याचे चित्र दिसून आले. यावेळी उपस्थित दारू पुरवठादारांकडून दादागिरीची भाषा वापरण्यात आली. त्या सामाजिक कार्यकर्त्यानी याची माहिती धाबा पोलिसांना दिली. लागलीच ठाणेदारांनी घटनास्थळावर पोलिस पथक पाठविले. घटनास्थळी पोलीस दाखल होतात त्यांनी दारूची वाहतूक करणाऱ्या डोंग्यासह मोटारसायकल व संशयित आरोपींना देखील ताब्यात घेतले आहे. यात किरमिरी येथील कुख्यात दारूविक्रेत्यासह तिघांचा समावेश आहे. दारूसह, डोंगा आणि मोटारसायकल पोलिसांनी जप्त केले असून या घटनेसंदर्भात अधिक तपास धाबा पोलिसांकडून सुरू आहे. यात ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातच धाबा गावात सुद्धा सुरू असलेल्या खुलेआम दारूविक्रीच्या प्रकाराची देखील चौकशी पोलिसांनी हाती घेतली आहे.

यासाठी संशयित आरोपीच्या शोधात पोलीस लागले असून या प्रकरणात काही लोकांना लवकरच अटक होण्याची शक्यता आहे. यामुळे धाबा परिसरात दारूविक्री विषय हा चांगलाच चर्चेचा ठरला आहे.

## पत्रुजी सागोते यांचे निधन

**चिमुर दि.०७ (प्रतिनिधी):** येथील ठक्कर वॉर्ड निवासी वारकरी भजन मंडळाचे अध्यक्ष पत्रूजी झिंगाजी सागोते यांचे, त्यांचे



राहते घरी काल सोमवार दिनांक ०६/०७/२० ला सायंकाळी साडेसहा वाजताचे दरम्यान वृद्धापकाळाने निधन झाले, मृत्यसमयी ते १०० वर्षाचे होते, आज मंगळवारी त्याचेवर उमा नदी काठावरील हिंदू स्मशानभूमी येथे ११ वाजता अंतिम संस्कार करण्यात येणार आहे . त्यांचे पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, नातवंड व बराच मोठा आप्त परिवार आहे .

## अखेर शेतकऱ्यांना वहीवाटी साठी रस्ता खुला

**चंद्रपूर दि.०७ (प्रतिनिधी):** माणीकगड सिमेंट कंपनी च्या माईन्स मधील रस्त्यावर मोठ मोठे गेट लावल्याने नोकरी कुसुंबी व लिंगणडोह येथील जनतेला ये जा करण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागत होता. या बाबत अनेकदा शासन प्रशासनाचे आंदोलन व निवेदन देवुन लक्ष वेधण्यात आले होते. परंतु तोडगा निघत नव्हता. आज सकाळी सहा वाजताच्या दरम्यान रामदास मंगाम (४०), जयराम कुळमेथे (३२), महादेव कुळमेथे (४०), सागर येडमे (३०), गणेश सिडाम (३५), असे पाच शेतकरी माईन्स मधील वसाहतीच्या परीसरात असलेल्या टावर वर चडुण विरु गिरी आंदोलन केले होते. आंदोलनाची माहीती मिळताच खडबडून प्रशासन जागे झाले होते राजुरा चे तहसीलदार होळी यांनी आंदोलकांना समजावण्याचा बराच प्रयत्न केला परंतु ते निष्फळ ठरले. नंतर परत पाच वाजता येवुन आंदोलन करत्याकवनसोबत चर्चा केली. व आज पासुन कंपनीचे कोणतेच रस्त्यावरील दरवाजे बंद करण्यात येणार नाही कंपनीने दरवाजे बंद केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल हा रस्ता नियमीत रित्या सुरूठेवण्यात येईल अशी हमी दिल्याने सुमारे दोन तास चाललेल्या वाटाघाटी ने अखेर चौदा तास सुरु असणारे आंदोलन मागे घेण्यात आले. व टावर चडुण असलेल्यांना खाली उतरविण्यात आले या प्रसंगी राजुरा चे तहसीलदार होळी गडचांदूर चे सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद शिंदे, शकील अंसारी व पोलीस कर्मचारी, जनसत्याग्रह संघटने चे अध्यक्ष आबीद अली व कुसुंबी येथील अन्यायग्रस्त शेतकरी, उपस्थित होते. चौदा तास सुरु असणारे आंदोलन मागे घेण्यात आले.

## कोरोना संसर्गाची साखळी खंडीत करणे गरजेची : ना. तनपुरे

### गडचांदूर नगर परिषदेत कोरोना विषयक आढावा बैठक



**चंद्रपूर दि.०७ (प्रतिनिधी):** कोरोनाच्या पाश?वभूमीवर सर्वांनीच उत्तम काम केलेले आहे. पुढच्या काळामध्ये देखील असेच काम ठेवून कोरोना संसर्गाची साखळी खंडीत करणे गरजेचे आहे. तसेच कोरोनाचा उद्रेक होणार नाही यासाठी नियोजन करावे. अशा सूचना राज्याचे नगर विकास, ऊर्जा, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, आदिवासी विकास, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी गडचांदूर येथे दिल्यात. काल ते चंद्रपूरच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी गडचांदूर नगर परिषदेत कोरोना विषयक आढावा बैठक घेतली.

गडचांदूर नगर परिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. विशाखा शेळके यांनी नगरपरिषद अंतर्गत आतापर्यत कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजना विषयक सविस्तर माहिती सादर केली. तसेच घनकचरा व्यवस्थापन करणे व घनकचऱ्यासाठी जागा उपलब्ध करणे, याविषयीची मागणी देखील त्यांनी ना.प्राजक्त तनपुरे यांना केली.

## रेती तस्करांकडे शासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष

**चंद्रपूर दि.०७ (प्रतिनिधी):** सावली तालुक्यात येणाऱ्या पाथरी, अंतरगाव, निफद्रा येथिल काही रेती तस्करांनी वैनगंगा नदी पात्रातील सुमारे २५० ते ३०० ब्रॉसरेती उत्खनन करून गोसीखुर्द कालव्याच्या बाजुला साठवणूक करून ठेवण्यात आली आहे. मात्र याकडे शासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत आहे.

शासनाने कोणत्याही रेती घाटाचे अद्याप लिलाव केलेला नाही मात्र या परीसरातील काही मोजक्या रेती तस्करांनी अधिकाऱ्यासोबत साठघाट करून आपल्याकडे रेती परवाना असल्याचे आव आणत रेती तस्करी जोमात सुरू आहे. या तस्करीमध्ये करोडो रुपयांच्या रेती साठा विकण्यात आला काही मोजक्या येथेच तस्करांनी केली ही तस्करी प्रशासनाच्या नजरेत असूनही त्यावर कारवाई का बरे करण्यात आली नाही याची चर्चा या परिसरात होत आहे.

काही दिवसांपुर्वी सावली च्या तहसीलदारांनी ३० ते ४० ब्रॉस रेती साठ्यावर कारवाई करण्यात आलेल्या रेतीचा लिलाव करून याच अवैध रेती तस्करांना विकण्यात आली होती. मात्र या तस्करांनी त्याच लिलावाच्या रेतीचा आधार घेत हजारो ब्रॉस चोरीची रेती शिरजोरपणे विक्री केली. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रेतीचे अवैध उत्खनन करण्यात आले आहे. या रेती तस्करांनी पाथरी परीसरातील अनेक गावांना रेतीचा हजारो रुपये घेऊन पुरवठा केला आहे. वैनगंगा नदीच्या पात्रातून रेतीचे हे ढिगारे पालेबारसा, हिरापूर, पाथरी, मेहा, निमगाव, मिरखल, दाबगांव या गावांमध्ये रेती तस्करांकडून लपून ठेवले जातात व तिथेच खूले आम विकले जातात. यापूर्वी २०१८ ते २०१९ ला देवाळकर कन्स्ट्रक्शन कंपनी ला लाखो रुपयांच्या रेती मातृयाचे उत्खनन करण्यात आले होते, त्यावेळी गोसीखुर्द प्रकल्पाचे कालव्याचे काम सूरूहोते पण कोणत्याच अधिकाऱ्यांनी या संबंधात चौकशी केली नाही, रेती तस्करांना अभय देण्यात आले. अंतरगाव ते मेहा या याठिकाणी रेती साठा करण्यात आला होता.

या चोरीच्या प्रकरणाची विधानसभेमध्ये चर्चा सुद्धा घडवण्यात आली सोबतच रेती तस्करांवर गुन्हे ही दाखल करण्यात आले होते पण त्यानंतर तेच रेती तस्कर याठिकाणी पून्हा सक्रीय झाले आहेत.

LLOYDS METALS

**Lloyds Metals and Energy Limited**

**Regd. Office:** Plot No. A 1-2, MIDC Area, Ghugus, Dist. Chandrapur, 442 505, Maharashtra. **Tel.:** 07172 285099 /103/398 **Fax:** 07172 285003.

**Corporate Office:** Trade World, "C" Wing, 16th Floor, Kamala City, Senapati Bapat Marg, Lower Parel, Mumbai-400 013. **Tel.No.:** 022- 6291 8111. **Fax No.:** 022-6291 8260 **CIN:** L40300MH1977PLC019594

**Website:** www.lloyds.in **Email:** investor@lloyds.in

**यासंदर्भात अधिसूचनांच्या अनुपालनात सूचना देण्यात आल्या आहेत रजि. २९ (१) सह वाचले रजि. ४७ (१)**

(ए) सेबी (सूचीबद्धता व प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५, की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक आयोजित केली जाईल. मंगळवार, १४ जुलै, २०२० व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे. बैठकीत एकमेकांशी चर्चा केली जाईल, संपलेल्या तिमाहीतील विनाअनुदानित आर्थिक परिणामांचा विचार करा आणि त्या नोंद घ्या ३० जून, २०२०.

पुढे, भारतीय सुरक्षा आणि विनिमय मंडळाच्या तरतुदींच्या अनुषंगाने (इनसाइडर ट्रेडिंगचा प्रतिबंध) विनियम, २०१५ आणि कंपनीचा अंतर्गत व्यापार आचारसंहिता, कंपनीच्या सिक्युरिटीजमध्ये व्यवहार करण्यासाठी ट्रेडिंग विंडो ०१ जुलै, २०२० पासून नियुक्त व्यक्ती आणि त्यांच्या निकटवर्तीयांसाठी बंद आहे. १६ जुलै, २०२० पर्यंत म्हणजे आर्थिक निकाल जाहीर झाल्यानंतर ४८ तास संपेपर्यंत १४ जुलै २०२० रोजी होणाऱ्या बोर्डाच्या बैठकीत. ही माहिती बीएसई लि. (www.bseindia.com) आणि वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे. एमएसईआय (www.msei.in) जिथे कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध आहेत आणि उपलब्ध आहेत. www.lloyds.in या कंपनीची वेबसाइटवर.

लॉयड्स मेटल्स आणि एनर्जी लिमिटेडसाठी

एसडी / -

**स्नेहा येझरकर**

कंपनी सचिव

तारीख: ०७/०७/२०२०

ठिकाण: मुंबई